# मुंबई विद्यापीठ

Under Certificate of Posting

निवडणूक विभाग
अत्यंत महत्वाचे

e-mail- arelection@mu.ac.in
Tel. No. - 022-2270 8710
022-2269 6147


क्र.नि.वि./अधिसभा/ /२०१०
दिनांक ८ डिसेंबर, २०१०

**परिपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम १९९४ मधील कलम २५ नुसार अधिसभेच्या शिक्षक-२२/१२/२०१० आणि नोंदणीकृत पदवीधर -२६/१२/२०१० रोजींच्या निवडणुकांबाबत,

मुंबई विद्यापीठाशी संलग्न/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य विद्यापीठीय संस्था आणि मान्यता प्राप्त संस्था यांचे विभागप्रमुख/संचालक, यांचे लक्ष निवडणूक अधिसूचना क्रमांक इएल/सिनेट-२५(२)(पी)/४३ फ २०१०, दिनाक १९ नोव्हेंबर, २०१० आणि निवडणूक अधिसूचना क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२) (आर) /१६४ फ/२०१०, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१० कडे वेधण्यात येते.

त्यांना याद्वारे कळविण्यात येते की, परिनियम क्रमांक ३५५(ए) यासह महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम १९९४ मधील कलम ११५(२)(१२) नुसार वरील निवडणुकांसाठी बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१० रोजी शिक्षकांची आणि रविवार, दिनांक २६ डिसेंबर, २०१० रोजी नोंदणीकृत पदविधरांची निवडणूक जाहिर करण्यात आली आहे.

सर्व संबंधित प्राचार्य, विभागप्रमुख आणि संचालक यांना याद्वारे कळविण्यात येते की, शिक्षकांना मतदानात भाग घेता यावा यासाठी बुधवार दि. २२ डिसेंबर, २०१० रोजी आपल्या महाविद्यालयामध्ये/विभागामध्ये/संस्थामध्ये खास कार्यक्रमांचे आयोजन करु नये. तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये शिक्षक मतदार संघातील आणि नोंदणीकृत पदवीधर मतदार संघासाठी मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत त्या महाविद्यालयांमध्ये निवडणुकीच्या प्रक्रीयेस बाधा निर्माण होऊ नये, यासाठी कोणतेही महत्वाचे कार्यक्रम आयोजित करु नयेत.

सही/-
(प्राचार्य एम.एस. कुऱ्हाडे)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अचधिकारी

मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - ८ डिसेंबर, २०१०.

कृ.मा.पा.

क्र.नि.वि./ /२०१० ८ डिसेंबर, २०१०

**प्रत, माहितीसाठी अग्रेषित** :-

प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये /स्वायत्त महाविद्यालये /संचलित महाविद्यालये,
विद्यापीठीय संस्था आणि मान्यताप्राप्त संस्था यांचे विभाग प्रमुख/संचालक,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक / विभाग प्रमुख,
शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव,
सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
परिक्षा नियंत्रक,
वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख,
नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री
सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र,
स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) कुलसचिव (३) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
मानद् समन्वयक, विद्यापीठ संगणीकरण केंद्र.

सही/-
(प्राचार्य एम.एस. कुऱ्हाडे)
प्रभारी कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

टिप :- उपरोक्त माहिती विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळी उपलब्ध आहे.